सकाळ

# माथेरानमधील सुविधांसाठी साडेसहा कोटींचा नि

## प्रस्तावित रोप-वेची छगन भुजबळांकडून पाहणी



सार्वजनिक बांधकाम व पर्यटनमंत्री छगन भुजबळ यांनी सोमवारी माथेरानच्या प्रस्तावित रोप-वे प्रकल्पाची पाहणी केली.

**संतोष पवार : सकाळ वृत्तसेवा**

माथेरान, ता. ४ : अनेक वर्षांपासून विविध हरकतींच्या फेऱ्यांमध्ये आणि दफ्तरदिरंगाईचा बळी ठरलेल्या माथेरानच्या प्रस्तावित रोप-वे प्रकल्पाची अधिसूचना सरकारकडून प्रसिद्ध झाल्यानंतर आज (ता. ४) सार्वजनिक बांधकाम व पर्यटनमंत्री छगन भुजबळ यांनी या प्रकल्पाची पाहणी केली. आमदार सुरेश लाड, रोप-वेचे प्रवर्तक विनयचंद कोठारी, माथेरानचे नगराध्यक्ष अजय सावंत, हॉटेल असोसिएशनचे अध्यक्ष अनिल पचोडीया यांच्यासह विविध अधिकारी, लोकप्रतिनिधी या वेळी उपस्थित होते.

माथेरानचा हा प्रस्तावित रोप-वे प्रकल्प नेरळ-कर्जत मार्गावरील भुतिवली गावापासून सुरू होणार आहे. ४.९ किलोमीटर लांबीचे अंतर दोन टप्प्यांत विभागण्यात आले आहे. या मार्गासाठी दोन वेगवेगळ्या पद्धतीचे रोप-वे बनविण्यात येणार आहेत. भुतिवली ते गार्बट या अंतरासाठी रोप-वे हे तंत्रज्ञान वापरण्यात येणार आहे; त्यापेक्षा गार्बट ते माधवजी पॉईंट - माथेरान या पावणेदोन किलोमीटर अंतरासाठी वेगळे तंत्रज्ञान वापरले जाणार आहे. त्यामुळे प्रस्तावित रोप-वेमुळे दोन वेगवेगळ्या रोप-वेचा पर्यटकांना आनंद घेता येणार आहे.

या रोप-वे प्रकल्पाची पाहणी केल्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत छगन भुजबळ यांनी माथेरानच्या पर्यटनविकासासाठी भरीव निधीची घोषणा केली. पर्यटनामधून माथेरानच्या पाणी योजनेसाठी १०० टक्के अनुदान दिले असल्याचे सांगताना वाहनतळासाठी सव्वा कोटी, शौचालयासाठी ३२ लाख, पॅनोरमा पॉईंट सुशोभीकरणासाठी ५० लाख, मायरा पॉईंट सुभोभीकरणासाठी ५७ लाख, प्रेक्षणीय स्थळांकडे जाणाऱ्या रस्त्यांच्या देखभाल - दुरुस्तीसाठी साडेतीन कोटी, असा माथेरान विकासासाठी साडेसहा कोटींचा निधी देण्यात आल्याची घोषणा छगन भुजबळ यांनी केली. या संदर्भातील अध्यादेश जाहीर झाला असून, ३१ मार्च २०१३ पूर्वी यापैकी पावणेदोन कोटी रुपये खर्च करण्याचे बंधन पालिकेवर असणार आहे.

याशिवाय माथेरानमधील सांडपाणी नियोजनासाठी पाच कोटींची योजना असून, त्यापैकी अडीच कोटी पर्यटनाच्या निधीतून पालिकेला देण्यात येणार आहेत.